| सांगली जिल्हा परिषद,सांगली. | |
| --- | --- |
| स्थायी समिती सर्वसाधारण सभेच्या कामकाजाचा कार्यवृत्तांत भाग-१<br>समिती सभागृह | |
| दिनांक १७ ऑगष्ट २०१५ | सभेची वेळ दुपारी ०२.००वा. |

| अ.क्र. | उपस्थित पदाधिकारी | पदनाम |
| --- | --- | --- |
| १. | श्रीम.रेश्माक्का उर्फ रशमक्का मदगोंडा होर्ती उर्फ होर्तीकर | अध्यक्ष,तथा सभापती स्थायी समिती, व जलव्यवस्थापन व स्वच्छता समिती जि.प.सांगली |
| २. | मा.श्री.लिंबाजी महिपती पाटील | उपाध्यक्ष तथा सभापती अर्थ व शिक्षण समिती. |
| ३. | मा. श्री.गजानन शिवलिंग कोठावळे | सभापती बांधकाम व आरोग्य समिती जि.प.सांगली |
| ४. | मा. सौ.मनिषा तानाजी पाटील | सभापती कृषि व पशुसंवर्धन समिती जि.प.सांगली |
| ५. | मा. सौ.उज्वला अशोक लांडगे | सभापती, समाजकल्याण समिती जि.प.सांगली |
| ६. | मा.सौ.पपाली यशवंत कचरे | सभापती महिला व बालकल्याण समिती |
| ७. | श्री.बसवराज सिदगोंडा पाटील | सदस्य स्थायी समिती. |
| ८. | श्री.संजीवकुमार आबासो सावंत | सदस्य स्थायी समिती. |
| ०९. | श्री.फिरोज सिराज शेख | सदस्य स्थायी समिती. |
| १०. | श्री.शांताराम (बापू) मोहनराव कदम | सदस्य स्थायी समिती. |
| ११. | श्री.हेमंत बालाजी पाटील | सदस्य स्थायी समिती. |
| १२. | श्री.देवराज जनार्दन पाटील | सदस्य स्थायी समिती. |
| १३. | श्री.रणधीर शिवाजीराव नाईक | सदस्य स्थायी समिती. |

| अ.क्र. | उपस्थित अधिकारी | पदनाम |
|---|---|---|
| १. | मा.श्री.दिलीप पाटील | प्र.मुख्य कार्यकारी अधिकारी |
| २. | श्री.विक्रांत बगाडे | उपमुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि)तथा सचिव,स्थायी समिती. |
| ३. | सौ.शुभांगी पाटोळे | मुख्य लेखा व वित्त अधिकारी |
| ४. | श्री.किरण जाधव | उपमुख्य कार्यकारी अधिकारी (बा.क.) |
| ५. | श्री.आर.जे.भोसले | कृषि विकास अधिकारी |
| ६. | श्री.राम हंकारे | जिल्हा आरोग्य अधिकारी |
| ७. | श्री.एस.जी.सादिगले | कार्यकारी अभियंता (ग्रापापु) |
| ८. | श्री.लोभा हवेलीकर | कार्यकारी अभियंता (छोपावि) |
| ९. | श्री.एस.व्ही.केतकर | प्र.जिल्हा पशुसवंर्धन अधिकारी |
| १० | श्री.सचिन कवले | जिल्हा समाजकल्याण अधिकारी |
| ११ | श्री.पी.के.प्रदिप | उप कार्यकारी अभियंता(बांध) |
| १२ | श्री. जी.बी.लाडे | उप अभियंता (भूजल) जिल्हा परिषद |
| १३. | श्री.जे.वाय.काळे | उपअभियंता, प्रकल्प संचालक जि.ग्रा.वि.यं. (प्रतिनिधी) |
| १४ | श्री.व्ही.एस.गेजगे | गट विकास अधिकारी (नरेगा) जि.प.सांगली |
| १५. | श्री.उत्तमराव वाघमोडे | गट विकास अधिकारी पंचायत समिती मिरज |
| १६. | श्री.संतोष जोशी | गट विकास अधिकारी पंचायत समिती विटा |
| १७. | श्री.ओमराज गहाणे | गट विकास अधिकारी पंचायत समिती जत |
| १८. | श्री.रमेश जोशी | गट विकास अधिकारी पंचायत समिती पलूस |
| १९. | श्री.संदिप पवार | गट विकास अधिकारी पं.स.क.महंकाळ |
| २०. | श्री.एस.व्ही.गाढवे | गट विकास अधिकारी पं.स. तासगांव |
| २१. | श्री.गोरख शेलार | गट विकास अधिकारी पं.स. कडेगांव |

| | | |
|---|---|---|
| २२. | श्री.एस.बी.ताडे | शाखा अभियंता(ग्रापापु) सांगली. |
| २३. | श्री.आर.आर.सरक | शाखा अभियंता (ग्रापापु) उपविभाग तासगांव |
| २४. | श्री.अे.जी.पाटील | शाखा अभियंता (बांध) |
| २५. | श्री.मोरे | शाखा अभियंता (छोपावि) |
| २६. | श्री.पी.पी.मेलगे | शाखा अभियंता,(यां) |
| २७. | श्रीमती म्हैत्रे अ.शि. | प्रतिनिधी शिक्षणाधिकारी (मा.) |
| २८. | श्री.महेश धोत्रे | प्रतिनिधी शिक्षणाधिकारी (प्रा.) |
| २९. | श्री.दिलीप मस्के | उपमुका ग्राप प्रतिनिधी, (स्वच्छ भारत अभियांन) |
| ३०. | श्री.एस.एन.कोळी | उपमुका ग्राप प्रतिनिधी, (वि.अ.पं.) |
| ३१. | श्री.अे.यु.पाटील | प्रतिनिधी ग.वि.अ. शिराळा विस्तार अधिकारी (पं.) |
| ३२. | श्री.एस.एस.लोहार | प्रतिनिधी ग.वि.अ. वाळवा विस्तार अधिकारी (पं.) |
| ३३. | श्री.गणेश फड | कक्ष अधिकारी सामान्य प्रशासन विभाग जि.प.सांगली. |
| ३४. | श्री. फिरोज शेख | अधिक्षक सामान्य प्रशासन विभाग जि.प.सांगली. |
| ३५. | श्री.एम.एस.माडगुळकर | प्रतिनिधी ग.वि.अ. आटपाडी (कक्ष अधिकारी) |
| ३६. | श्री.संतोष वीर | अधिक्षक जि.प.सांगली.मा.अध्यक्ष यांचे स्वीय सहा. |
| ३७. | श्री.संतोष चौगुले | अधिक्षक,ग्राप. विभाग जि.प.सांगली. |
| ३८. | सौ.शुभदा चिटणिस | लघुलेखक (निम्नश्रेणी), साप्रवि जि.प.सांगली. |
| ३९. | श्री.सुशांत पाटील | लघुलेखक (निम्नश्रेणी), शिक्षण विभाग जि.प.सांगली. |
| ४०. | श्री.पी.एच.जगताप | क.सहा. साप्रवि सभा शाखा जि.प.सांगली. |

**स्थायी समिती सभा संक्षिप्त कार्यवृतांत**

जिल्हा परिषद, सांगली स्थायी समितीची सभा दिनांक १७/०८/२०१५ रोजी समिती सभागृह, जि.प.सांगली येथे संपन्न झाली. मा.श्रीमती रेश्माक्का होर्तीकर, सभापती स्थायी समिती तथा अध्यक्ष जिल्हा परिषद, सांगली यांनी सभेसाठी उपस्थित सर्व सन्मा.स्थायी समिती सदस्य, मुख्य कार्यकारी अधिकारी, सर्व खातेप्रमुख, गटविकास अधिकारी

व कर्मचारी यांचे स्वागत करुन सभेच्या कामकाजास सुरुवात करणेस सूचित केले. सर्व उपस्थितांचे स्वागत करुन सभेच्या कामकाजास सुरुवात करणेत आली.

**श्री.फिरोज शेख, सदस्य,यांनी खालील प्रमाणे अभिनंदनाचा ठराव मांडला त्यास** सौ.मनिषा पाटील सभापती कृषी व पशुसंवर्धन यांनी अनुमोदन दिले.

दि.१३ ऑगष्ट ते १६ ऑगष्ट २०१५ या कालावधीत आटपाडी येथे झालेले कृषि प्रदर्शन यशस्वीरित्या पार पाडण्यामध्ये जिल्हा परिषदेचे मा.अध्यक्ष,उपाध्यक्ष, सर्व विषय समिती सभापती, सन्मा.जि.प./पं.स सदस्य, जि.प.चे सर्व खातेप्रमुख व ज्यांनी यामध्ये योगदान दिले त्या सर्वांच्या अभिनंदनाचा ठराव मंजूर करणेत यावा.

**उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा) तथा सचिव यांनी-** मागील दिनांक २१.०७.२०१५ रोजी झालेल्या स्थायी समिती सभेच्या कामकाजाचा कार्यवृत्तांत वाचून कायम करणेबाबतचा विषय सादर केला असता,

**श्री.देवराज पाटील सदस्य -** इतिवृत्तामध्ये महिला व बालकल्याण विभागाकडील आढाव्यामध्ये कुपवाड येथील छाप्यामध्ये संबंधीतांकडे फूड लायसन नसलेचे आढळून आले आहे. असा उल्लेख केलेला आहे. त्याऐवजी कुपवाड येथील छाप्यामध्ये संबंधीताकडे फूड लायसन असल्याचे आढळून आले आहे अशी दुरुस्ती करुन अहवाल कायम करणेत आला.

**श्री.रणधीर नाईक, सदस्यः-** शेखरवाडी ता.वाळवा येथील ग्रामस्थांचे ग्रामपंचायतीसमोर उपोषण चालले आहे. त्या गावांतील ग्रामसेवकाबद्दल १५ दिवसापूर्वी तक्रारी अर्ज दिलेला आहे. त्यांनी भ्रष्टाचार, गैरव्यवहार केला असून त्याच्यावर कारवाई व्हावी. पं.स.चे गट विकास अधिकारी व उपअभियंता यांनी त्यांनी केलेली कामे तपासली आहेत, त्यातील किती कामे निकृष्ट आहेत, किती कामांचे MB लिहिणे अगोदर पेमेंट केले आहे. अशा ज्या बाबी आहेत त्याचा चौकशी अहवाल त्यांनी जिल्हा स्तरावर पाठविला आहे. त्या ग्रामसेवकांवर कारवाई केल्या शिवाय ग्रामस्थ उपोषण सोडणेस तयार नाहीत. तरी संबंधीत ग्रामसेवक दोषी असल्यास त्याचेवर कठोर कारवाई करणेसंबंधी प्रशासनाने काय निर्णय घेतला आहे.

**प्र.मुख्य कार्यकारी अधिकारी** :- शेखरवाडी ता.वाळवा येथील ग्रामसेवका विरुध्दच्या तक्रारींचा चौकशी अहवाल नुकताच प्राप्त झाला आहे. अहवाल पाहून योग्य तो निर्णय घेणेत येतआहे.

**मा.श्रीमती रेशमाक्का होर्तीकर, अध्यक्षाः-** ग्रामसेवकांच्याबद्दल तक्रारी वाढत चाललेल्या आहेत. ग्रामसेवकांनी शासकीय नियमावली नुसारच काम करणे गरजेचे आहे. तसेच ग्रामसेवकांना ग्रामपंचायतीच्या कामकाज नियमावली संबधी प्रशिक्षण देणे गरजेचे आहे. त्यांनी नियमाप्रमाणे कामकाज केले पाहिजे.

**श्री.रणधीर नाईक, सदस्यः-** ज्या ग्रामसेवकांच्या वारंवार तक्रारी होतात. पूर्वी एकदा निलंबीत झालेला आहे. परत निलंबनाची कारवाई होणार आहे. अशा ग्रामसेवकांच्या बाबतीत कठोर कारवाई झाली पाहिजे.

**प्र.मुख्य कार्यकारी अधिकारी :-** सर्व ग्रामपंचायतीच्या दप्तर तपासण्या केल्या. त्यातील १०४ ग्रामपंचायतीच्या तपासणीमध्ये गंभीर त्रुटी आढळून आलेल्या आहेत. ज्या ग्रामसेवकांच्या तक्रारी आहेत त्यांच्या बाबतीत गविअ यांनी कारवाई करणे अपेक्षित होते. सदरची कारवाई झाली की नाही याचा आढावा हि सभा संपल्यानंतर ग.वि.अ. यांचेकडून घेणार आहोत.

**मा.श्रीमती रेशमाक्का होर्तीकर,अध्यक्षा:-** ज्या ग्रामसेवकांच्या बद्यल तक्रारी आहेत त्यांचेवर कारवाई करणेचे काम गट विकास अधिकारी यांनी केले किंवा नाही? सर्व ग्रामपंचायतीची तपासणी केलेली आहे. तपासणीमध्ये आढळलेल्या त्रुटी परत दिसल्या नाही पाहिजेत.

**श्री.रणधीर नाईक, सदस्य:-** विस्तार अधिकारी, गट विकास अधिकारी यांनी ज्या तपासण्या करावयाच्या आहेत तेवढया तरी त्यांनी व्यवस्थित तपासल्या तरी अशा गंभीर त्रुटी पुन्हा पुन्हा होणार नाहीत याबाबत दक्षता घेतली पाहिजे.

**श्री.बसवराज पाटील, सदस्य:-** ग्रामपंचायत तपासणी मोहिम जि.प.प्रशासनाने पारदर्शी पणाने राबविण्याचा प्रश्न केला पण कांहीही निष्पन्न झाले नाही. ग्रामस्थ उपोषणाला बसल्यानंतर हे प्रशासनाच्या लक्षात येत असेल तर ते बरोबर नाही. जे ग्रामसेवक भ्रष्टाचारी, गैरव्यवहार करणारे आहेत त्यांना निलंबीत / त्यांचेवर फौजदारी गुन्हे दाखल किंवा बडतर्फ करा. जि.प.च्या प्रशासनाचा जनतेमध्ये नावलौकिक होईल अशी कारवाई करावी. १४ वा वित्त आयोग, इको व्हिलेजचा सर्व निधी ग्रामपंचायत स्तरावर देतो. उप मु.का.अ./मु.का.अ.यांनी प्रशासकीय कारवाई केली पाहिजे.

**प्र.मुख्य कार्यकारी अधिकारी :-** या विषयाचा स्वतंत्रपणे सविस्तर आढावा घेवून आवश्यक ती कारवाई करीत आहे.

**श्री.रणधीर नाईक, सदस्य:-** एखादी तक्रार केली तर त्याची दखल घेतली जात नाही. उपोषणाला बसल्यानंतर मग आपण त्याकडे लक्ष देतो हे बरोबर नाही. तक्रार प्राप्त झाल्यानंतर त्याची त्वरीत दखल घेतली पाहिजे.

**प्र.मुख्य कार्यकारी अधिकारी :-** कोणतीही तक्रार झाली तर आठ दिवसात त्याचा प्राथमिक चौकशी अहवाल आला पाहिजे. दूर्लक्ष करु नये. यापेक्षा जास्त वेळ लागला तर जाणीवपूर्वक दूर्लक्ष केलेले आहे असा त्यातून अर्थ निघतो. तेंव्हा सर्व खातेप्रमुखांनी याची नोंदघ्यावी.

यानंतर उपमुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि) तथा सचिव यांनी पुढीलप्रमाणे विषय सादर केले

**विषय क्र.२:-** शासनाकडील महत्त्वाचे शासन निर्णय व परिपत्रकांचे वाचन करणे व

**विषय क्र.३:-** विषय समित्यांच्या मासिक सभांचे कार्यवृत्तांताचा व विभागाकडील कामकाजाचा आढावा घेणे

**विषय क्र.२ व ३ सादर झालेनंतर,**

**वित्त विभाग:-** मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी १३ व्या वित्त आयोग खर्च व पूर्ण अपूर्ण कामांची माहिती दिली. यामध्ये मुख्यत्वे १३ वा वित्त आयोगातील शिल्लक निधी चा खर्च सप्टेंबर १५ अखेर करणेचा असल्याचे

सांगितले. तिन्ही स्तरावरील मिळून १३ वा वित्तआयोगाच्या निधीचा खर्च ७४ टक्के व पूर्ण कामांची टक्केवारी ९० टक्के आहे.

**श्री.बसवराज पाटील, सदस्य:-** १४व्या वित्त आयोग खर्चाच्या संदर्भात शासन निर्णय प्राप्त झाले कां?

**मुख्य लेखा व वित्त अधिकारी:-** १४ वा वित्त आयोगाचा निधी जि.प.स्तरावर काढून ठेवावयाचे आहेत. खर्चाबाबत शासनाकडून अद्यांप आदेश प्राप्त झालेले नाहीत.

**आरोग्य विभाग**

**जिल्हा आरोग्य अधिकारी :-** यांनी बाबनिहाय कामाचा अहवाल दिला. यामध्ये मुख्यत्वे करुन आतापर्यंत ३३ टक्के काम होणे अपेक्षित होते त्यानुसार सर्व बार्बीमध्ये ३४ टक्के काम झालेले आहे. कुटुंब कल्याण शस्त्रक्रियेचे प्रमाण ३८ टक्के आहे. सध्या जिल्हयामध्ये कोणतीही साथ नाही. फक्त स्वाईनफ्लूचे ५ पेशंट आढळलेले आहेत त्यातील ४ पॉझिटिव्ह आहेत. याबाबत आरोग्य यंत्रणेने पाठपुरावा करुन रुग्ण शोध मोहिम घेतलेली आहे. मार्च २०१५ पासून स्वाईनफ्लूची ट्रिटमेंट खाजगी रुग्णालयात घेतली असेल तर त्याचे बील मुख्यमंत्री सहाय्य निधीतून देणेत येते.

**श्री.रणधीर नाईक, सदस्य:-** जि.प.कडे असे प्रस्ताव कां प्राप्त होत नाहीत. याबाबत लोकांना कांहीच माहित नाही. खाजगी दवाखान्याना याबाबत कळविणे गरजेचे आहे.

**जिल्हा आरोग्य अधिकारी:-** खाजगीमध्ये उपचार घेतलेला एकच पेशंट आहे. शासकिय दवाखान्यामध्येच जास्त पेशंट उपचार घेतात.

**श्री.रणधीर नाईक, सदस्य:-** स्वाईनफ्ल्यूच्या उपचाराच्या सुविधांबाबत वर्तमानपत्रात प्रसिध्दी देणेत यावी.

**जिल्हा आरोग्य अधिकारी:-** पेपरला प्रेस नोट देत आहोत. पाणी नमुने तपासणीमध्ये दुषित पाण्याचे प्रमाण मागील महिन्यापेक्षा कमी झालेले आहे. टीसीएल तपासणीमध्ये २० टक्के पेक्षा कमी प्रमाण असलेल्या २ ग्रा.पं.आहेत. सरळ विहीरीतून पाणी पुरवठा करणा-या ग्रा.पं.ची माहिती मागविलेली आहे. याबाबतचा सर्व्हे करुन उपाययोजना करीत आहोत.

**श्री.रणधीर नाईक, सदस्य:-** विहीरीतून सरळ पाणीपुरवठा करणा-या १३ ग्रा.पं.आहेत. या ग्रामपंचायती ज्या ज्या तालुक्यामध्ये आहेत त्या गट विकास अधिकारी यांनी याबाबत पाठपुरावा करुन योग्य उपाययोजना करणेबाबत सूचना देणेत याव्यात.

**जिल्हा आरोग्य अधिकारी:-** पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग व आरोग्य विभाग यांचेमार्फत संयुक्त बैठक घेवून आवश्यक त्या सूचना दिलेल्या आहेत.

**बांधकाम विभाग**

**उपकार्यकारी अभियंता (इवद) :-** यांनी योजनानिहाय प्राप्त निधी व खर्चाची माहिती दिली.

**श्री.बसवराज पाटील, सदस्यः-** स्वीय निधीतून रस्त्यासाठी तरतूद आहे कां? असल्यास त्यामधून कुठले रस्ते घेतले आहेत याची यादी देणेत यावी.

**उपकार्यकारी अभियंता (इवद) :-** यादी उपलब्ध करुन देत आहे.

**श्री.रणधीर नाईक, सदस्यः-** जि.प.च्या मालमत्ता भाडे तत्त्वावर दिलेले आहेत. त्यातील किती इमारतींचे भाडे थकित आहे?

**उपकार्यकारी अभियंता :-** जि.प.मधील भाडयाच्या १० जागांपैकी ५ जागांचे भाडे भरणेत आलेले आहे. सांगली जि.प.अभियंता सोसायटीस चालू महिन्यापासून भरलेले आहे. थकित भरलेले नाही. आण्णासाहेब पतसंस्थेची चौकशी सुरु असलेने त्यांनी एक महिन्याची मुदत मागितली आहे.

**श्री.रणधीर नाईक,सदस्यः-** मागील थकित भाडे अगोदर भरुन घ्यावे.

**श्री.गजानन कोठावळे, सभापती, बांधकाम व आरोग्य समिती :-** जि.प. अभियंता सोसायटीला पूर्वीपासून भाडेची आकारणी केलेली नव्हती चालू महिन्यापासून भाडे आकारणी सुरु केलेली आहे. कर्मचारी सोसायटी असल्यामुळे मोफत देण्यात आलेले होते. बाकी शासकीय कार्यालयांकडील भाडे वसूल झालेले आहे. माध्यमिक शिक्षण विभाग भाडे द्यायला तयार नाही.

**श्री.बसवराज पाटील, सदस्यः-** माध्यमिक शिक्षण विभागास इमारत भाडेसाठी शासनाकडून पैसे मिळतात परंतू विभागाकडून कार्यवाही होत नाही.

**श्री.गजानन कोठावळे, सभापती, बांधकाम व आरोग्य समिती :-** विटा व तासगांव येथील गाळयांचे भाडे वसूली बाबत सूचना दिलेल्या आहेत.

**ग.वि.अ.पं.स.तासगांवः-** सर्व गाळेधारकांना भाडे भरणेबाबत नोटीस दिलेली आहे. त्यातील दोन गाळे बचतगटांनी परवानगी न घेता सुरु केलेले आहेत. त्यांना भाडे सुरु केलेले नाही. तसेच दोन गाळयांच्या बाबत न्यायालयीन केस सुरु असल्याने त्यांनी भाडे भरलेले नाही.

**श्री.गजानन कोठावळे, सभापती, बांधकाम व आरोग्य समिती :-** ज्या गाळयांना भाडे चालू केलेले नाही त्यांचे भाडे ताबडतोब सुरु करा. सर्व गाळेधारकांकडून थकित भाडे त्वरीत वसूल करुन घ्यावेत.

**ग.वि.अ.पं.स.विटाः-** एकूण १८ गाळेधारकांपैकी ४/५ लोकांनी भाडे भरले आहे. उर्वरित गाळेधारकांना भाडे न भरल्यास सिल करणेची कार्यवाही करणेत येईल असे कळविणेत आले आहे.

**श्री.रणधीर नाईक, सदस्यः-** शाळा खोल्यांचे भाडे वसूली थकीत किती आहे? तसेच वसूली न होण्याचे कारणे काय ? याची सविस्तर माहिती पुढील सभेचे वेळी देणेत यावी.

**प्र.मुख्य कार्यकारी अधिकारीः-** जिल्हयातील सर्व जि.प.च्या शाळा खोल्यांचे भाडे वसुलीबाबतची सविस्तर माहिती घेणेत यावी.

**श्री.बसवराज पाटील, सदस्यः-** खातेप्रमुख आपले प्रतिनिधी सभेस उपस्थित रहाणेसाठी पाठवितात त्या प्रतिनिधीनी विभागाची संपूर्ण माहिती घेवून आले पाहिजे. जि.प.च्या सर्वात महत्वांच्या स्थायी समितीचा मान राखला पाहिजे. प्रतिनिधींना माहिती सांगता येत नसेल तर सभेस उपस्थित रहाणेत काय अर्थ आहे?

**शिक्षणाधिकारी (प्राथ) प्रतिनिधी :-** शिक्षणाधिकारी मा.शिक्षण उपसंचालक, कोल्हापूर यांचे कार्यालयामध्ये मा.शिक्षण आयुक्त यांचे बैठकीसाठी गेल्यामुळे या सभेला मी उपस्थित राहीलो आहे.

**मा.श्रीमती रेशमाक्का होर्तीकर, अध्यक्षा:-** प्रतिनिधींनी सभेस उपस्थित रहाताना परवानगी घेवून आले पाहिजे. तसेच खातेप्रमुखांनी सुध्दा उपस्थित राहू शकणार नसतील तर परवानगी घ्यायला पाहिजे. याबाबत अनेकवेळा सूचना दिलेल्या आहेत परंतू सूचनांची अंमलबजावणी होत नाही. हे बरोबर नाही. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी याबाबत सर्वांना लेखी सूचना द्याव्यात.

<u>**समाजकल्याण विभाग**</u>

**समाजकल्याण अधिकारी :-** यांनी योजनानिहाय सद्यस्थितीचा आढावा दिला. यामध्ये प्रामुख्याने वसंत घरकूल योजनेसाठी र.रु.१ ाा कोटीची तरतूद आहे. प्रस्ताव मागणी केलेले आहेत. प्रशासकीय मान्यतेचा प्रस्ताव मा.आयुक्त यांचेकडे पाठविणेत आलेला असलेचे सांगितले. अपंग घरकुलासाठी रु.१ कोटी तरतूद असून प्रशा.मान्यतेचा प्रस्ताव मा.आयुक्तांचेकडे पाठविलेला आहे. दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत जी कमिटी होती ती बरखास्त करणेत येऊन जि.प.सभेला मंजूरीचे अधिकार दिलेले आहेत. गटविकास अधिकारी यांनी प्रस्ताव तयार करुन देणेचे आहेत.

**श्री.बसवराज पाटील, सदस्य:-** गेल्या वर्षी वसंत घरकुलासाठी सदस्यांचेकडून फॉर्म घेतले परंतू अद्याप त्यांना घरकूले दिलेली नाहीत.

**श्री.रणधीर नाईक, सदस्य:-** वसंत घरकूल, दलित वस्ती सुधार योजनेतील अपूर्ण कामे पूर्ण करुन घेणेसाठी काय नियोजन केले आहे?

**समाजकल्याण अधिकारीः-** सर्व सन्मा.सदस्यांना अपूर्ण कामांची यादी दिलेली आहे. सर्व ग.वि.अ.यांना सूचना दिलेल्या आहेत. ब-यापैकी अपूर्ण कामे पूर्ण होत आलेली आहेत. अलिकडच्या दोन वर्षातील अपूर्ण कामे जास्त आहेत.

**श्री.रणधीर नाईक,सदस्य:-**ज्या ठिकाणची कामे अपूर्ण आहेत त्या गावांतील लोकांशी चर्चा करुन प्रश्न मिटवावेत .

**श्री.बसवराज पाटील, सदस्य:-**दोन वर्षापासून दलितवस्ती सुधार योजनेच्या कामासाठी पैसे देऊनही कामे अपूर्ण राहिलेली आहेत. या कामासाठी टक्केवारी नुसार निधी न सोडता पूर्ण निधी सोडून ती कामे प्रथम पूर्ण करुन घ्यावीत. मगच त्या ठिकाणी नविन काम घेण्यात यावीत.

**समाज कल्याण अधिकारी:-** त्यांची मागणी आली की लगेच देवू. काम पूर्ण झाल्यानंतर उर्वरित रक्कम देणेत येत आहे.

**श्री.बसवराज पाटील, सदस्य:-** याबाबत सर्व संबंधीत गट विकास अधिकारी व ग्रामपंचायत यांना कळविणेत यावे.

**श्री.देवराज पाटील, सदस्य:-** दलित वस्ती सुधार योजना अपूर्ण कामांची माहिती सर्व तालुक्याकडून मागवून घ्यावी व त्यांचेकडून मागणी घेवून निधी तात्काळ वितरीत करणेत यावा.

**श्री.रणधीर नाईक, सदस्य:-** अपूर्ण घरकूल असलेल्या लाभार्थ्यांना रक्कम वसुलीच्या नोटीसा पाठविल्या आहेत काय?

**समाजकल्याण अधिकारी :-** अर्थसमिती सभेमध्ये ठराव घेतला आहे की,दोन वर्षातील कामे असतील तर निधी देवून पूर्ण करुन घेणेत यावे तसेच दोन वर्षापूर्वीची जी कामे आहेत त्यांना पैसे देऊ नयेत.

**श्री.रणधीर नाईक, सदस्य:-** लाभार्थ्यांचेकडून वसूली करायची म्हंटले तर लाभार्थ्यांना अडचण येईल. पंचायत समिती स्तरावरुन वसुलीबाबत अहवाल आला तर वसुली घेणेस हरकत नाही. लाभार्थी निहाय अपूर्ण घरकुलांची माहिती घ्यावी व मगच वसुलीची कार्यवाही करावी.

**श्री.गजानन कोठावळे, सभापती, बांधकाम व आरोग्य समिती :-** घरकुल मंजूर केलेले लाभार्थी खरोखरच गरीब असतात त्यांना घरकूल पूर्ण झालेनंतर आपण पैसे देतो. पण ही घरकुले पूर्ण करणेसाठी अनेक अडचणी असतात.

**समाजकल्याण अधिकारी :-** सन २००७-०८ पासून कांही घरकुल अपूर्ण आहेत. जत तालुक्यामध्ये भरपूर घरे अपूर्ण आहेत.

**श्री.रणधीर नाईक, सदस्य:-** अपूर्ण घरकुलाबाबत संबंधीत ग्रामसेवकांचेकडून अहवाल घेणेत यावा. ग्रामपंचायतींनी जर वसुलीची शिफारस केली तर वसुली घ्यावी. ज्या लाभार्थ्यांची अडचण असेल त्यांचेकडून वसूली घेवू नये.

**ग.वि.अ.तासगांव :-** अपूर्ण घरकुलांचा आढावा घेतला असता, कांही लाभार्थ्यांनी पहिला हप्ता घेतला परंतू कांहीही काम केलेले नाही. काही ठिकाणी अर्धवट काम करुन सोडलेले असते त्यांना फौजदारी करणेबाबतच्या नोटीसा दिलेल्या आहेत.

**श्री.रणधीर नाईक, सदस्य:-** कांही थोडे लाभार्थी तसे असतील परंतू कांही लाभार्थ्यांना आर्थिक अडचणी असू शकते. ग्रामपंचायतीकडून लाभार्थीनिहाय अहवाल घ्यावा मगच वसुली करावी.

**श्री.बसवराज पाटील, सदस्य:-** ज्या लाभार्थ्यांनी घरकुलाचे काम पूर्ण केलेले आहे त्यांना २-या हप्ता मंजूरीसाठी शिफारस केली जात नाही.

**श्री.रणधीर नाईक, सदस्य:-** घरकुलाच्या दुस-या व तिस-या हप्त्याची मागणी केल्यानंतर ठराविक वेळेत दिले पाहिजेत.

**समाजकल्याण अधिकारी :-** घरकुलाच्या रु.७५००० मंजूर अनुदानापैकी रु.६०००० प्रमाणे निधी पंचायत समिती स्तरावर वितरीत करणेत आलेला आहे. उर्वरित रु.१५००० प्रमाणेचा निधी देणेसाठी मा.आयुक्त, पुणे यांचेकडून प्रशासकीय मान्यता मिळालेली नाही.

**श्री.रणधीर नाईक, सदस्य :-** याबाबत किती दिवसात निर्णय देऊ शकता? मागणी केल्यानंतर किती दिवसात रक्कम देणेत यावी याबाबत ग.वि.अ.यांना कळविणेत यावे.

**श्री.बसवराज पाटील,सदस्य:-** गट विकास अधिकारी यांनी ही जबाबदारी स्विकारली पाहिजे. बांधकामाचे फोटो किती वेळा द्यायचे असतात? लाभार्थ्यांना विनाकारण हेलपाटे घालावे लागतात ते बंद झाले पाहिजेत.

**श्री.रणधीर नाईक, सदस्य:-** ही बाब गंभीर आहे आणि बहुतांश ठिकाणी हे होते आहे.

**ग.वि.अ.पं.स.तासगांव:-** लाभार्थ्यांचेकडून मागणी आल्यानंतर ८ दिवसात पैसे देणेमध्ये कांही अडचण नाही. परंतू समाजकल्याण विभागाकडून सन २०१२-१३ मध्ये मंजूर केलेल्या घरकुलांसाठी २-या हप्त्याचे पैसे मिळालेले नाहीत.

**मुख्य लेखा व वित्त अधिकारी :-** प्रशासकीय मान्यता ही अंदाजपत्रकीय तरतूद र.रु.१ा कोटीला घ्यावयाची नसून नवीन प्रस्तावांना घ्यावयाची असते. नवीन प्रस्तावांना प्रशा.मान्यता घेताना स्पील ओव्हरसाठी निधी राखून ठेवला पाहिजे.

**श्री.रणधीर नाईक, सदस्य:-** अपूर्ण कामांसाठी निधी राखून ठेवला पाहिजे. रु.१ा कोटी मधील अपूर्ण कामांसाठी रु.४० लाख राखून ठेवले पाहिजेत.

**मुख्य लेखा व वित्त अधिकारी:-** अपूर्ण कामासाठी रु.५० लाख लागणार असतील तर रु.१ कोटीच्या प्रस्तावांनाच प्रशासकीय मान्यता घ्यायला पाहिजे.

**श्री.बसवराज पाटील, सदस्य:-** नवीन प्रस्ताव मंजूर करीत असताना स्पील किती रक्कमेचे आहे हे लक्षात घेवून तरतूद मंजूर करुन घ्यायला पाहिजे होती.

**श्री. रणधीर नाईक, सदस्य:-** सर्व सदस्यांना एक याप्रमाणे किमान ६२ घरकुले तरी मंजूर करायला पाहिजेत. यावर्षीचे बजेट संपले की तर जादा मागणी करावी.

**श्री.बसवराज पाटील, सदस्य:-** नवीन प्रस्ताव मंजूर करीत असताना स्पील किती रक्कमेचे आहे हे लक्षात घेवून मंजूर करावेत.

**समाजकल्याण अधिकारी:-** सन २०१२-१३ चे हप्ते रिलीज करणे अजून बाकी आहे. रु.७५ लाख याप्रमाणे १०० घरकुले बसू शकतात.

**श्री.रणधीर नाईक, सदस्य :-** सन २०१२-१३ मधील घरकुलांचे २ ऱ्या व ३ ऱ्या हप्त्याची मागणी केल्यानंतर विभागाकडून काय सांगणेत येते.?

**श्री.गजानन कोठावळे, सभापती, बांधकाम व अरोग्य समिती :-** लाभार्थ्यांना दुसरा-तिसरा हप्ता देण्यामध्ये कांही अडचण नाही. किती तालुक्याकडून मागणी आलेली आहे?

**मुख्य लेखा व वित्त अधिकारी:-**ग.वि.अ.यांचेकडे घरकुलासाठीचे जे पैसे शिल्लक आहेत त्यातून ते देवू शकतात.

**ग.वि.अ.पं.स.तासगांव:-** निधी वितरीत करताना लाभार्थीनिहाय करणेत आलेले आहेत. त्यामुळे देता येत नाहीत.

**समाजकल्याण अधिकारी:-** अपूर्ण घरकुलांसाठी पैसे ठेवून चालू वर्षी मिटींगमध्ये घरे मंजूर केली पाहिजेत.

**श्री.रणधीर नाईक, सदस्य:-** जादा तरतूद मंजूर करुन घ्यावी. मागील अपूर्ण घरे व चालू वर्षाची २०० घरे एवढी तरतूद मंजूर करुन घ्यावी.

**श्री.बसवराज पाटील, सदस्य:-** घरे मंजूर करतांना ज्याप्रमाणे समाजकल्याण समितीच्या सदस्यांना देण्यात येतील तेवढीच घरे स्थायी समिती सदस्यांना देणेत यावीत.

**श्रीमती रेशमाक्का होर्तीकर, अध्यक्षा:-** वसंत घरकुलासाठी जादा निधीची मागणी करावी.

**<u>महिला व बालकल्याण विभाग</u>**

**उपमुख्य कार्यकारी अधिकारी (मबाक)** यांनी योजनानिहाय सद्यस्थितीचा आढावा दिला. यामध्ये मुख्यत्वे, अंगणवाडी इमारतीचे ११० प्रस्ताव प्राप्त झालेले आहेत. अजून १०० प्रस्तावांची आवश्यकता आहे. ज्या ठिकाणी अंगणवाडी इमारतीसाठी जागा उपलब्ध नाही अशा अंगणवाडींची यादी सर्व सन्मा.सदस्यांना देणेत आलेली आहे. बालविकास प्रकल्प अधिकाऱ्यांची १३ पदे रिक्त आहेत. शासनाकडे पाठपुरावा सुरु आहे.

**श्री.गजानन कोठावळे, सभापती, बांधकाम व आरोग्य समिती:-** कोल्हापूर जि.प.ने सेस फंडातून आरोग्य विभागाच्या मेडीकल ऑफिसर जागा भरलेल्या आहेत त्याप्रमाणे आपल्या जि.प.मध्ये भरणेत याव्यात.

**श्री.बसवराज पाटील, सदस्य:-** पुढील आर्थिक वर्षात स्वीय निधीतून नवीन हेड ओपन करुन जागा भरता येतील.

**श्री.रणधीर नाईक, सदस्य:-** जिल्हा परिषदेच्या स्वीय निधीवर किती बोजा येईल हे पाहिले पाहिजे.

**जिल्हा आरोग्य अधिकारी:-** जिल्हयामध्ये एकुण ५९ प्रा.आ.कें.पैकी २७ डॉक्टरांची रिक्त पदे भरणे गरजेचे आहे. यामध्ये तीन प्रा.आ.केंद्रांना प्रत्येकी २ वैद्य.अधिकारी असे ६ वै.अ., ८ आयुर्वेदिक दवाखान्यांना प्रत्येकी दोन याप्रमाणे १६ वै.अ. व तीन पदे तालुका आरोग्य अधिकारी अशी २५ पदे भरणे आवश्यक आहेत. यासाठी अंदाजे वर्षाला रु.३६ लाख वेतनासाठी खर्च येईल.

**श्री.बसवराज पाटील, सदस्य:-** जि.प.स्वीय निधीवर किती भार बसेल याचा विचार करुन ठरवले पाहिजे. डॉक्टरांच्या मानधनावर किती खर्च येईल हे काढले पाहिजे.

**जिल्हा आरोग्य अधिकारी:-** जि.प.स्वीय निधीतून मानधनावर डॉक्टर घेताना, शासनाकडून डॉक्टरांची पदे भरली की, करार पध्दतीने घेतलेल्या डॉक्टरांची पदे संपुष्टात येतील अशी अट घालून पदे भरणेत यावीत.

**श्री.बसवराज पाटील, सदस्य:-** प्रा.आ.केंद्रामध्ये प्रामाणिकपणे सेवा उपलब्ध करुन दिली पाहिजे. ग्रामीण भागामध्ये प्रा.आ.केंद्रांची काय परिस्थिती आहे हे आपल्याला माहितच आहे. ओपीडी किती होते?

**जिल्हा आरोग्य अधिकारी:-** प्रा.आ.केंद्रामध्ये ओपीडी व आयपीडी ची संख्या वाढलेली आहे.

**श्री.रणधीर नाईक, सदस्य:-** प्रस्ताव तयार करुन स्थायी समितीपुढे विषय ठेवणेत यावा.

**<u>कृषि विभाग</u>**

**कृषि विकास अधिकारी :-** यांनी योजनानिहाय प्राप्त निधी व खर्चाची माहिती दिली. यामध्ये मुख्यत्वे, चापकटर, ताडपत्री , बॅटरी स्प्रे पंप पुरवठा याची प्रशासकीय मान्यतेचे विषय जि.प.सभेपुढे ठेवलेले आहेत. ३ व ५ एच.पी. मोटारीचे रु.५० लाखाचे पुरवठा आदेश दिलेले असून कांही ठिकाणी पुरवठा झालेला आहे. बायोगॅससाठी १३५० लक्षांक असून १८२ प्रस्ताव आलेले आहेत. विशेष घटक योजनेसाठी रु.४॥ कोटी नियतव्यय मंजूर असून पैकी ३ कोटी प्राप्त झालेले आहेत. प्रस्ताव येतील त्याप्रमाणे मंजूरीची कार्यवाही चालू आहे.

**श्री.रणधीर नाईक, सदस्य:-** सागांव येथे १७ लाभार्थ्यांना बायोगॅस मंजूर आहेत. स्वत:ची जागा नाही. घरकुलासाठी गायरानची जागा दिलेली आहे. त्याठिकाणी त्यांनी घरकुल बांधले, लाईट-पाणी दिले परंतू बायोगॅस बसविला परंतू त्याचे अनुदान थांबवले आहे कारण त्या लाभार्थ्याच्या नांवावर जागा नाही इतर हक्कात नोंद आहे. घरकुलासाठी पैसे मिळू शकतात मग बायोगॅसचे कां मिळत नाहीत?

**कृषि विकास अधिकारी:-** शासनाकडे प्रस्ताव पाठवून बायोगॅसचे अनुदान देणेस मान्यता घेवू.

**श्री.बसवराज पाटील, सदस्य:-** ज्या लाभार्थ्यांना घरे बांधायला परवानगी दिली त्यावेळी गायरानमधील जागा हस्तांतर करुन देण्याचा अधिकार मा.जिल्हाधिकारी यांना आहेत. त्यामुळे बायोगॅससाठी सुध्दा मा.जिल्हाधिकारी यांची मान्यता घेवून लाभ देणेत यावा.

**श्री.रणधीर नाईक, सदस्य:-** बियाणे, खताचे नमुने जें फेल झालेले आहेत त्या कंपन्यांच्यावर काय कार्यवाही केली आहे?

**कृषि विकास अधिकारी:-** बियाणांचे किंवा खतांचे नमुने फेल गेले तर त्यांना नोटीस दिली जाते. जास्त प्रमाणात असेल तर कोर्ट केस दाखल होते. आपण अशा बाबतीत कोर्टकेस दाखल केलेल्या आहेत. संबंधीत कंपनीवर कारवाई केली जाते.

<u>ग्रामीण पाणी पुरवठा विभाग</u>

**कार्यकारी अभियंता (ग्रापापु) :-** यांनी सद्यस्थितीचा आढावा दिला. यामध्ये मुख्यत्वे जिल्हयामध्ये टंचाई अंतर्गत जत २६, तासगांव २ व खानापूर ३ असे एकूण ३ तालुक्यामध्ये ३१ टँकरने पाणी पुरवठा चालू आहे. टंचाई अंतर्गत निधी उपलब्ध आहे. मागणीनुसार निधी वितरीत करणेत येत आहे. दलित वस्तीमध्ये नळकनेक्शन व शौचालयासाठी पैसे देणेत आलेले आहेत. यामध्ये शिराळा, जत, खानापूर यांचेकडून मागणी आलेली नाही.

**श्री.बसवराज पाटील, सदस्य :-** पाण्याची वितरण व्यवस्था नीट झालेली नाही. हे सर्व पूर्ण झाल्याशिवाय पैसे देऊ शकत नाही.

**कार्यकारी अभियंता(ग्रापापु) :-** शासन निर्णय प्राप्त झालेला आहे. यामध्ये सन २०१५-१६ च्या आराखडयामध्ये आठपट गांवे घेतलेली आहेत त्याला स्थगिती देणेत आलेली आहे. प्रशासकीय मान्यता देता येते.

**श्री.रणधीर नाईक, सदस्य:-** प्रादेशिक पाणी पुरवठा योजनांच्या दुरुस्तीबाबत चर्चा झालेली होती. त्याचे काय झाले?

**कार्यकारी अभियंता (ग्रापापु):-** १२ प्रादेशिक पा.पु.योजनांच्या दुरुस्तीसाठी रु.१० कोटी खर्च येईल. योजनांचे उत्पन्न ७ कोटी रु.आहे. त्यामध्ये कर्मचा-यांचे पगार, देखभाल दुरुस्ती, वीज बील यांचा खर्च असतो. जि.प.स्वीय निधीतून तरतूद मंजूर केली तर दुरुस्तीचे काम टप्प्याटप्प्याने होऊ शकेल.

**श्री.रणधीर नाईक, सदस्य:-** प्रादे.पा.पु.योजनांच्या दुरुस्तीसाठी जिल्हा नियोजन समितीकडे निधीची मागणी करावी.

**कार्यकारी अभियंता (ग्रापापु):-** शासन निर्णयानुसार २० टक्के निधी दुरुस्तीसाठी मिळतात. डीपीसीकडून दुरुस्तीसाठी पैसे मिळणार नाहीत. २० वर्षापूर्वीच्या पा.पु.योजना आहेत. ते बदलून घेण्यासाठी रु.२ ते ३ कोटी तरतूद करावी लागेल.

**श्री.रणधीर नाईक, सदस्य:-** ही बाब जि.प.च्या आवाक्या बाहेरची आहे. मा.पालक मंत्री महोदय यांचेकडे पाठपुरावा केला पाहिजे.

**श्री.बसवराज पाटील,सदस्य:-** प्रानपापु योजनेच्या दुरुस्तीसाठी डीपीसी मधून तरतूद करुन घ्यावी.

**श्री.देवराज पाटील, सदस्य:-** एकदम सगळया योजनांच्या दुरुस्ती करण्यापेक्षा टप्प्याटप्प्याने करणेत यावी.

**श्री.रणधीर नाईक, सदस्य:-** सर्व प्रादे.पाणी पुरवठा योजनांची पाहणी करुन दुरुस्तीचा आराखडा तयार करावा व नंतर टप्प्याटप्प्याने दुरुस्ती करावी लागेल.

<u>पशुसंवर्धन विभाग</u>

**प्र.जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी :-** यांनी योजनानिहाय सद्यस्थितीचा आढावा दिला. तसेच दिनांक १३ ऑगष्ट ते १६ ऑगष्ट अखेर आटपाडी येथे संपन्न झालेल्या कृषि प्रदर्शनाबाबतची माहिती दिली. यामध्ये मुख्यत्वे सदर

प्रदर्शनास लोकांचा भरपूर प्रतिसाद मिळाला असून प्रदर्शनामध्ये १९५ जनावरे आलेली होती. नवनवीन उद्योग व्यवसाय, शेळी पालन वगैरे बाबत शेतक-यांना मार्गदर्शन मिळाले. जवळपास १ लाख लोकांनी प्रदर्शनास भेट दिली.

**श्री.बसवराज पाटील,सदस्यः-** स्वीय निधीतून शेळी गट वाटप योजनेसाठी तरतूद केलेली आहे त्याचे काय नियोजन केले आहे? नवीन फॉर्म छापून घेवून लोकांचेकडूत भरुन घेतले आहेत कां? विशेष घटक योजनेंतर्गत लाभाचे फॉर्म पशुवैद्यकिय दवाखान्यामध्ये ठेवले आहेत. वि.घ.यो मधील लोक शोधून काढतात व त्यांना फॉर्म दिले जातात. जि.प.सदस्यांना याबाबत कांही कळविले आहे कां? त्यांना फॉर्म कां दिले नाहीत?

**मुख्य कार्यकारी अधिकारीः-** मागच्या वर्षीचे फॉर्म दिले असतील तर ते valid आहेत कां?

**श्री.बसवराज पाटील, सदस्यः-** सदर निवडीबाबत जिल्हाधिकारी यांना अधिकार आहेत असे सांगितले जाते.

**जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी :-** लोकनेते राजारामबापू पाटील ५० टक्के अनुदानावर शेळी गट वाटप योजनेचे कोणतेही फॉर्म वाटलेले नाहीत.

**श्री.बसवराज पाटील, सदस्यः-** जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी यांचा कार्यभार देणेसंदर्भात पेपरला बातमी वाचली. सिनीयर लोक असतांना श्री.कदम यांना कां चार्ज दिला? प्रशासनाला मिडीयाने जाग आणल्यानंतर परत ऑर्डर बदलणेत आली हे बरोबर नाही.

**प्र.मुख्य कार्यकारी अधिकारीः-** ज्येष्ठतेप्रमाणे जे लोक होते ते यशदा येथे ट्रेनिंगला होते. एक डॉक्टर सिनियर होते परंतू त्यांनी चार्ज घेणेस नकार दिला. म्हणून डॉ.कदम यांना चार्ज दिलेला होता. ते दोषी आहेत वगैरे आपल्याकडे कांहीही आलेले नाही. फक्त ते वादग्रस्त असल्यामुळे त्यांचेकडून चार्ज काढून दुस-या डॉक्टरना दिलेला आहे.

**श्री.रणधीर नाईक, सदस्यः-** ग्रा.पा.पु.विभागाकडील स्वर्णजयंती योजनेचे अनुदान अद्याप मिळालेले नाही.

**कार्यकारी अभियंता (ग्रापापु):-** ताळमेळ घेण्याचे काम राहिलेले होते ते पूर्ण झालेले आहे. दोन-तीन दिवसांत पैसे मिळतील.

**श्री.रणधीर नाईक, सदस्यः-** आपल्याकडे मध्यंतरी तक्रार झाली होती की, शिलाई मशीन वितरण संदर्भात एक माणसाने महिलांचेकडून अॅडव्हान्स पैसे घेतलेले होते.

**उपमुख्य कार्यकारी अधिकारी (मबाक):-** महिला व बालकल्याण विभागाशी संबंधीत हा विषय होता. गट विकास अधिकारी, पं.स.तासगांव यांनी संबंधीताविरुध्द पोलिस स्टेशनला गुन्हा दाखल केलेला आहे. शिलाई मशीन देणार व प्रशिक्षणही देणार आहेत असे सांगून पैसे गोळा केले होते. सदरच्या फॉर्मवर जि.ग्रा.वि.यं.सांगली असे लिहिले होते.

**एमआरईजीएस**

**गट विकास अधिकारी (MREGS) :-** यांनी बाबनिहाय सद्यस्थितीचा आढावा दिला. यामध्ये मुख्यत्वे, जिल्हयामध्ये १४७ गावांमध्ये एमआरईजीएस अंतर्गत कामे सुरु असून १७७ कामांवर १९३६९ मजूर उपस्थिती असल्याचे सांगितले.

**प्राथमिक शिक्षण विभाग**

**उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक):-** यांनी जि.प.स्वीय निधी अंतर्गत योजनांबाबत सद्यस्थितीचा आढावा दिला. यामध्ये मुख्यत्वे, शालेय् विविध स्पर्धा सुरु असून २ सप्टेंबर १५ अखेर पूर्ण होणार असलेचे सांगितले. या स्पर्धांमध्ये मागील वर्षापर्यंत जि.प.प्राथमिक शाळांसह खाजगी शाळांनासुध्दा भाग घेता येत होता. परंतू लेखा परिक्षणामध्ये याबाबत शक घेतल्यामुळे चालू वर्षीपासून फक्त जि.प.प्राथमिक शाळांतील विद्यार्थ्यांनाच स्पर्धांमध्ये भाग घेता येईल असा बदल करणेत आलेला आहे.

**श्री.गजानन कोठावळे, सभापती, बांधकाम व आरोग्य समिती :-** लेखा परिक्षण आक्षेप आहे की, स्पर्धेमध्ये खाजगी शाळांतील मुलांमध्ये जि.प.शाळांतील मुले टिकत नाहीत म्हणून बंद करणेत आले?

**उपशिक्षणाधिकारी (प्रा):-** तसे कांही नाही. जि.प.शाळांतील मुले स्पर्धेमध्ये चांगली टिकतात. फक्त लेखा आक्षेपामुळे खाजगी शाळांना वगळणेत आलेले आहे.

**श्री.रणधीर नाईक, सदस्य:-** जि.प.स्वीय निधीतून सगळया विद्यार्थ्यांसाठी ही स्पर्धा घेतलेली आहे यामध्ये आक्षेप घेणेचे कांही कारण नाही.

**श्री.लिंबाजी पाटील, उपाध्यक्ष:-** सगळया शाळांनी भाग घेतला तर अडचण येईल म्हणून चालू वर्षी फक्त जि.प.शाळांसाठी स्पर्धा घेतलेल्या आहेत.

**श्री.रणधीर नाईक, सदस्य:-** स्पर्धा चांगली व्हावयाची असेल तर खाजगी शाळांचा सहभाग असला पाहिजे.पुढील वर्षी यामध्ये बदल करुन जि.प.प्राथमिक शाळांबरोबर खाजगी शाळांनाही भाग घेता येईल असे करावे. तसेच क्रिडा स्पर्धेचा समावेश करुन बक्षिसांची रक्कम सुध्दा वाढविणेत यावी.

**मुख्य लेखा व वित्त अधिकारी:-** शालेय स्पर्धांसाठी रु.१ा लाख तरतूद केलेली आहे ती वाढवून देता येईल.

**उपशिक्षणाधिकारी(प्राथ):-** सदर शालेय स्पर्धांमध्ये क्रिडा स्पर्धांचा अंतर्भाव केलेला नाही तो करावा लागेल.

**श्री.बसवराज पाटील, सदस्य:-** क्रिडा स्पर्धांचा समावेश करुन व खाजगी शाळांतील विद्यार्थ्यांनाही भाग घेता येईल अशा शालेय क्रिडा स्पर्धा पुढील वर्षी घेणेत याव्यात. तरतूदही वाढवून देता येईल.